**<u>प्रतिवादी तर्फे साक्षीदार क्र. २ चा जवाबदावा</u>**

नाव - माणिक अण्णासाहेब वाघमारे

वय - ४५ वर्षे

धंदा - नोकरी

रा. - उप-अधिक्षक भुमी अभिलेख, केज, ता. केज, जि बिड.

**<u>साक्षीदाराचा सरतपास प्रतिवादी तर्फे श्री. पी.एल. नरहरे यांचे तर्फे शपथेवर सरु-</u>**

मी सन २०१४ ते २०१९ या कालावधीमध्ये उप-अधिक्षक भुमी अभिलेख कार्यालय निलंगा येथे भुमापक या पदावर कार्यरत होतो. आमच्या कार्यालयाकडे मो.र. क्र. १३१८/१८ च्या मोजणी करिता प्रकरण दाखल केले होते. सदरचा अर्ज गोपाळ तुकाराम नरहारे यांनी दिला होता. ती मोजणी करण्याकरिता कार्यालयाने माझी नेमणुक केली होती. सदर मोजणी करण्यापूर्वी मोजणी गट क्र. १४५ च्या लगतच्या हिस्सेदाराना मी नोटीस काढल्या होत्या. दिनांक १३.०४.२०१८ रोजी मी अर्जात नमूद केलेला टाकळी गावातील गट क. १४५ च्या मोजणीकरिता जाय मोक्यावर गेलो होतो. मोजणीकरिता अर्जदार व लगतचे शेतकरी हजर होते. मी त्या गट क. १४५ ची मोजणी प्लेन टेबलपध्दतीने केली होती. मोजणी केल्यानंतर मला मोजणी नकाशात दर्शविले प्रमाणे लाल रंगाने दर्शवलेले क्षेत्र गट क्र. १४६ चे असून ते क्षेत्र गट क्र. १४५ च्या धारकाचे ताबे वहिवाटीत होते, असे आढळून आले.ते क्षेत्रएकूण ९८ आर होते. तसेच हिरव्या रंगाने दर्शविलेले क्षेत्र गट क.१४५ मधील असून ते गट क्र. १४० च्या धारकाच्या ताबेवहिटीत होते.असे दिसून आले.ते क्षेत्र एकूण १२ आर होते. काळया रंगाने दर्शविलेले क्षेत्र गट क.१४५ असून मधील असून ते गट क्र. १४२ च्या धारकाच्या ताबेवहिटीत होते.असे दिसून आले.ते क्षेत्र एकूण १३ आर होते. केसरी रंगाने दर्शविलेले क्षेत्र गट क.१४५ मधील असून ते गट क्र. १४३ च्या धारकाच्या ताबेवहिटीत होते.असे दिसून आले.ते क्षेत्र एकूण १७ आर होते. निळया रंगाने

दर्शविलेले क्षेत्र गट क.१४५ मधील असून ते गट क्र. १४४ च्या धारकाच्या ताबेवहिटीत होते.असे दिसून आले.ते क्षेत्र एकूण ३५ आर होते. दिनांक २३.०५.२०११ रोजी मोजणी केलेल्या मिळकत गट क्र. १४५ ची हद्द कायम केली होती.

मोजणीस केल्यानंतर पंचनामा केला होता.मी तो पंचनाामा आणि मोजणी नकाशाची क शीट दाखवल्यास ओळखू शकतो. (आता मला दि. १३.०४.२०१८ रोजीचा पंचनामा व मोजणीा नकाशाची क शीट दाखवण्यात आली) तो पंचनामा मी केलेला असून त्याचेवर आमचे कार्यालयाचा शिक्का असून माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. **त्यास नि.क्र.६३** देण्यात आली. मी आज रोजी सोबत दि. १३.०४.२०१८ रोजीच्या मोजणीची संचीका आणली आहे. त्या संचीकेमध्ये सदर मोजणी वेळी तयार केली अ शीट आहे. त्या मोजणी वेळी एकूण तीन, अ,ब,क, शिट तयार केल्या होत्या. त्यापैकी क शीट अर्जदारला दिली होती. आता मला दाखवण्यात आलेली क शीट मी दिनांक १३.०४.२०१८ रोजी केलेल्या मोजणीची क शीट आहे. त्यावर आमचे कार्यालयाचा शिक्का असून माझी सही आहे. मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र. ६४** देण्यात आली.

उलटतपासाकरिता वादी व त्यांचे विधीज्ञ डि.पी.धैर्य यांचा वारंवार पुकारा केला असता गैरहजर. सबब उलटतपास नाही.

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत,**

GUNJAVATE APARNA SHIVAJI
Digitally signed by GUNJAVATE APARNA SHIVAJI
Date: 2025.10.18 11:35:42 +0530

**(श्रीमती ए.एस.गुंजवटे)**
**दिनांकः- १०/१०/२०२५. सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, निलंगा.**
**ठिकाणः- निलंगा. जिल्हा लातूर.**